(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# महिला सक्षमीकरण आणि कायदे

**प्रा. सौ. अंबिका रमेश चौगुले** श्री बळवंतराव यादव ज्युनि. कॉलेज, पेठ वडगाव ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

---

**उदिष्टे** –

१) महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने नोकरदार महिलांच्या विविध मर्यादा जाणून घेणे.

२) महिलाच्या सक्षमीकरणात येनाऱ्या अडचणी मर्यादा जाणून घेणे

3) महिला सशक्तीकरणाऱ्या मार्गातील अडचणी व समस्यावर उपाययोजना सुचवणे

**गृहीतके :-**

१) विविध कायद्यांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सामाजिक, शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या सक्षमीकरण होऊ शकते. महिलांच्या सशक्तीकरणासाठी विविध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

**अभ्यासपद्धती -** प्रकृत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे.

**१) प्रस्तावना**

भारतात प्राचीन काळापासून ने आजअखेर समाजाने लिंगभेदाच्या आधारावर स्त्री-पुरुष यात फरक व अंतर निर्माण केले आहे. वास्तविक स्त्री हि निर्मिती आहे, उत्पत्तीची जननी आहे तरीसुध्दा प्राचीन काळ, वैदिककाळ, स्वातंत्र्यपूर्वकाळ व स्वातंतत्र्योत्तरकाळ असेल सर्व काळात स्त्रीयांचे कार्यक्षेत्र मर्यादा "चूल आणि मूल" इतकेच निश्चित केले आहे. परंतु आता महिलांनी "देश आणि विदेश" याकडे सुद्धा लक्ष देणे गरजेचे आहे.

१९८५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमध्ये महिला सक्षमीकरणाचा श्रीगणेशा. नंतर भारताने सुध्छा २००१ हे वर्ष महिला "सक्षमीकरण वर्ष" म्हणून जाहीर केले. महाराष्ट्र शासनाने सुद्धा २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित केले. विविध क्षेत्रात महिलांनी दिलेल्या भरीव योगदानावरून महिला सक्षमीकरण ही काळाची गरज बनली आहे असे स्पष्ट निश्चित झाले आहे. त्यासाठी विविध धोरणे, योजना व कायद्याची आखणी व प्रभावी अमलबजावणी, होणे गरजेचे आहे.

**विविध क्षेत्रातील महिलांची सद्यस्थिती**

**१) कौटुंबिक क्षेत्र**

प्राचीन काळाशी तुलना करता आधुनिक काळात महिला कुटुंबाचा कणा / आधार बनल्या आहेत. कुटुंबात मोलकरीण म्हणून भूमिका न करता मालकीण बनुन कुटुंबाची सहचारी बनली आहे. कौटुंबिक दर्जा स्थान मान प्रतिष्ठा उंचावली आहे.

**२) राजकीय क्षेत्र**

आज शासनाने महिला राजकीय क्षेत्रात 50% आरक्षण दिले आहे. निवडनुकीला उभे राहणे, मतदान करणे, इ अधिकार मिळाले आहेत.

- भारतात २००९ मध्ये १५ व्या लोकसभा निवडणुकीत ५२ महिला निवडून आल्या होत्या, तर २०१९ मध्ये १७ व्या लोकसभा निवडणुकीत ७८ महिला खासदार म्हणून निवडून आल्या.

**३) शैक्षणिक क्षेत्र**

शैक्षणिक क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचा सहभाग मोठा दिसून येतो स्वातंत्र्यपूर्वीच्या काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात महिला साक्षरता प्रमाणात खुप वाढ झाल्याचे दिसते. १९५१ च्या जनगणनेनुसा महिला साक्षरता दर फक्त ८.८६ % होता तर २०११ च्या जनगणनेनुसार महिला साक्षरता प्रमाण ६५.४६% माहे.

**४) आर्थिक क्षेत्र**

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांचे क्षेत्र फक्त चूल व मुल होते. परंतु आधुनिक काळात महिला शेती, उद्योग, सेवा इ अनेक क्षेतात प्रवेश करुन आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाल्या आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकील शिक्षक, उद्योजक संशोधक, इ भूमिका यशस्वीपणे पार पडताना दिसतात.

**५) सामाजिक क्षेत्र**

प्राचीन काळ / स्वातंत्र्योपूर्व काळाच्या तुलनेत स्वातंत्र्योउत्तर काळात महिलांना सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा खुपसुधारली आहे. जुन्या प्रथा परंपरा रूढीच्या बंधनातून बाहेर पडल्या आहेत. स्वतःच्या हक्क विषयी त्याच्या जाणीव होऊन अन्यायाविरुध्द लढा व प्रतिकार करत आहेत.

**६) महिला सक्षमीकरण**

विविध कायदे, धोरणे व योजनांच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय, इ सर्व क्षेत्रात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क संधी, दर्जा, प्राप्त करून स्त्री-पुरुष असमानला नष्ट करणे स्त्री या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरन म्हणतात. स्त्री सक्षमीकरणात खालील घटकांचा समावेश होतो

- लैंगिक आरोग्य - आर्थिक साक्षरता
- शैक्षणिक सक्षमता - राजकीय साक्षरता
- मानसिक सक्षमता - शारीरिक साक्षरता

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात काळानुसार बदल करुन २००१ मध्ये दुसरे व २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले. या सर्व धोरणामधुन प्रामुख्याने पुढील विशेष भर देण्यात आला

१) स्त्रीयांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे

२) आर्थिक दर्जात सुधारणा

३) प्रसारमाध्यमाची भूमिका

४) स्वयंसेवी संस्थाचा सहभाग

५) बचतगटांबा विकास

६) शासकीय निमशासकीय यंत्रणामध्ये स्त्रीयांना ३०% आरक्षण

७) स्थानिक स्वराज्य संस्थान ५०% आरक्षण

८) महिला आर्थिक विकास महामंडळाकडून अर्थसहाय्य

९) स्त्रीयांना व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करणे

१०) वैद्यकिय सुविधा पतपुरवठा, मालमत्ता मालकी हक्क इ.

**विविध क्षेत्रातील महिलांची सद्यस्थिती**

**१) कौटुंबिक क्षेत्र**

प्राचीन काळाशी तुलना करता आधुनिक काळात महिला कुटुंबाचा कणा / आधार बनल्या आहेत. कुटुंबात मोलकरीण म्हणून भूमिका न करता मालकीण बनुन कुटुंबाची सहचारी बनली आहे. कौटुंबिक दर्जा स्थान मान प्रतिष्ठा उंचावली आहे.

**२) राजकीय क्षेत्र**

आज शासनाने महिला राजकीय क्षेत्रात 50% आरक्षण दिले आहे. निवडनुकीला उभे राहणे, मतदान करणे, इ अधिकार मिळाले आहेत.

- भारतात २००९ मध्ये १५ व्या लोकसभा निवडणुकीत ५२ महिला निवडून आल्या होत्या, तर २०१९ मध्ये १७ व्या लोकसभा निवडणुकीत ७८ महिला खासदार म्हणून निवडून आल्या.

**३) शैक्षणिक क्षेत्र**

शैक्षणिक क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचा सहभाग मोठा दिसून येतो स्वातंत्र्यपूर्वीच्या काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात महिला साक्षरता प्रमाणात खुप वाढ झाल्याचे दिसते. १९५१ च्या जनगणनेनुसा महिला साक्षरता दर फक्त ८.८६ % होता तर २०११ च्या जनगणनेनुसार महिला साक्षरता प्रमाण ६५.४६% माहे.

**४) आर्थिक क्षेत्र**

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांचे क्षेत्र फक्त चूल व मुल होते. परंतु आधुनिक काळात महिला शेती, उद्योग, सेवा इ अनेक क्षेतात प्रवेश करुन आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाल्या आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकील शिक्षक, उद्योजक संशोधक, इ भूमिका यशस्वीपणे पार पडताना दिसतात.

**५) सामाजिक क्षेत्र**

प्राचीन काळ / स्वातंत्र्योपूर्व काळाच्या तुलनेत स्वातंत्र्योउत्तर काळात महिलांना सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा खुपसुधारली आहे. जुन्या प्रथा परंपरा रूढीच्या बंधनातून बाहेर पडल्या आहेत. स्वतःच्या हक्क विषयी त्याच्या जाणीव होऊन अन्यायाविरुध्द लढा व प्रतिकार करत आहेत.

**६) महिला सक्षमीकरण**

विविध कायदे, धोरणे व योजनांच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय, इ सर्व क्षेत्रात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क संधी, दर्जा, प्राप्त करून स्त्री-पुरुष असमानला नष्ट करणे स्त्री या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरन म्हणतात. स्त्री सक्षमीकरणात खालील घटकांचा समावेश होतो

- लैंगिक आरोग्य - आर्थिक साक्षरता
- शैक्षणिक सक्षमता - राजकीय साक्षरता
- मानसिक सक्षमता - शारीरिक साक्षरता

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात काळानुसार बदल करुन २००१ मध्ये दुसरे व २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले. या सर्व धोरणामधुन प्रामुख्याने पुढील विशेष भर देण्यात आला.

१) स्त्रीयांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे

२) आर्थिक दर्जात सुधारणा

३) प्रसारमाध्यमाची भूमिका

४) स्वयंसेवी संस्थाचा सहभाग

५) बचतगटांबा विकास

६) शासकीय निमशासकीय यंत्रणामध्ये स्त्रीयांना ३०% आरक्षण

७) स्थानिक स्वराज्य संस्थान ५०% आरक्षण

८) महिला आर्थिक विकास महामंडळाकडून अर्थसहाय्य

९) स्त्रीयांना व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करणे

१०) वैद्यकिय सुविधा पतपुरवठा, मालमत्ता मालकी हक्क इ.

**नोकरदार महिलांसाठी उपयुक्त कायदे**

**१) समान वेतन कायदा १९७६**

बदलत्या काळानुसार महिला उच्चशिक्षण, व्यावसायिक, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षन घेवुन स्वतःच्या कष्टावर जोरावर मेहनतीने बुध्दीमत्तेने कतृत्वाचा ठसा उमटवू लागल्या आहेत. तेव्हा तिच्या कामाची कर्तुत्वाची दखल घेणे गरजेचे आहे. महिलांना मिळणारा मोबदला काम व गुणवत्ता यावर आधारीत हवा म्हणजे समान वेतन कायदा -१९७६ ला मंजूर झाला. लिंगभेद न करता "समान काम समान दाम" या तत्वाच्या आधारावर हा कायूदा मंजुर करण्यात आला.

या कायदयातील तरतुदींचे पालन न केल्यास १ वर्षापर्यत कैद होऊ शकते तसेच १० ते २० हजार रुपये पर्यत दंडाची शिक्षा आहे.

**२) किमान वेतन मंजूरी अधिनियम १९४८**

मजुरांचे शोषण (जादा कामासाठी दाम) थांबवण्यासाठी घटनेत अशी मरतूद केली आहे.कि मजुराने केलेल्या कामासाठी कामासाठी शासनाने ठरवलेली किमान वेतन मजुरी दिली जावी यालाच किमान वेतन कायदा असे म्हणतात.

खाडी फोडणाऱ्या शेतात काम करण्याऱ्या खाण कामगारांना तसेच हंगामी काम करणाऱ्या मजुराना हा कायदा लागू आहे. कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या मजुरांना हा कायदा लागू आहे.

या कायदयानुसार कामाच्या प्रत्येक ठिकाणी महिला व पुरुषांसाठी वेगवेगळी स्वच्छतागृह व स्नानगृह असणे आवश्यक आहे. धोकादायक ठिकाणी महिलांना काम करण्यास बंदी आहे. कारखाने कायदा १९४८ च्या कलम ४८ नुसार ज्याठिकाणी ३० पेक्षा जास्त महिला कामगार असतात त्या ठिकाणी कामगाराच्या मुलांसाठी शिशुगृहे आवश्यक आहेत. तसेच महिलांना रात्रपाळी सुरक्षतेच्या हमीवर करण्यास परवानगी दिली आहे. कारखाने कायदा लागू असणाऱ्या उदयोगमध्ये या गोष्टी नमुद केल्या आहेत.

**४) कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा कामाच्या लैगिक छळ (प्रतिबंध आणि दाद) कायदा-२०१३**

अलीकडच्या काळात महिलांच्या लैगिक छळाच्या संदर्भात अनेत घटना सातत्याने समोर येत आहेत. म्हणूनच शासनाला हा कायदा करणे भाग पडले असून लैंगिक ठिकाणी महिलांचा "कामाच्या छळ (प्रतिबंध व निवारण अधिनियम २०१३, हा संसदीय कायदा केला.

या कायन्याअंतर्गत लैंगिक अत्याचाराची व्याख्या करण्यात आली आहे ती अशी "जेव्हा एखादी व्यक्ती, बोलून, नबोलता, / कृतीने कींवा स्पर्शाने लैंगिक अर्थाने कृत्य करून महिलेला त्रास देते, ज्यामुळे या महिलेला, मानसिक धक्का बसतो तेव्हा त्यास लैंगिक छळणूक असे समजावे.

**५) प्रसूती सुविधा कायदा**

शासनाने ६ महिन्यापर्यंत वाढवलेल्या या प्रसूती रजेमुळे देशभरातल्या महिलांनी शासनाला धन्यवाद दिले आहे. १९६१ च्या मैटर्निटी बेनिफिट नुसार गरोदर स्त्रीला बाळतपणात कमीतकमी ३ महिन्याची सुट्टी मिळणे बंधनकारक आहे. कायदयानुसार गरोदरपणातील रजा पूर्णपगारी देण्याची तजवीज आहे. फक्त शासकीय नोकरी करणाऱ्या महिलानाच नाहींतर निमशासकीय खाजगी संस्थामध्ये ही महिलांना प्रसूती रजेचा अधिकार देण्यात आला आहे. प्रसूतीरजेच्या काळात कंपनीने / अस्थापनाने वेतन देण्याचे नाकारलेतर ३ महिने तुरुंवास व २००० रु दंड अशी किंवा दोन्ही शिक्षा होवु शकतात

**1961 नंतर बदलत गेलेला कायदा**

1994- केरार तत्वावरील महिलांना प्रसुतीरजा मंजुर

2009-राज्य सरकारी महिलांना १८० दिवसाची रजा मंजुर

2017- प्रसूती रजा १२ आठवडयावरून २८ आठवडे पर्यंत वाढवली

५०% त्यापेक्षा जास्त महिला महिला कर्मचारी असलेल्या कंपनीला आपल्या निधारित परिसरात पाळणाघराची सोय करणे बंधकारक आहे.

**६) गर्भपाताबाबतचा कायदा**

समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी, स्त्रीभ्रूणहत्या रोखणेसाठी गर्भलिंग तपासणी विरोधी कायदा म्हणजेच PCPNDT कायदा आवश्यक आहे. विशिष्ट परिस्थितीतच गर्भपात करून घेण्याचा हक्क मेडीकल टर्मिनेशन ऑफ प्रेगन्सी ॲक्ट १९७१ च्या कायदयानुसार प्रत्येक स्त्रीला मिळाला आहे, गर्भधारणेपूर्वी व प्रसूतीपूर्वी गर्भलिंग तपासणी विरुद्ध कायदा हा गर्भलिंग तपासणी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या गैरवापराला आळा घालणेसाठी हा कायदा समंत केला आहे.

**समस्या / मर्यादा**

**१) महिलांच्या योगदानाच्या मुल्यांकनाचा अभाव**

प्राचीन काळापासून ने आधुनिक काळापर्यत महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने समाजाच्या प्रगतीमध्ये दिलेले योगदान व प्रयत्न यांचे मूल्यमापन केल गेले नाही. कौटूबिक, जबाबदारी, मुलांचे पालनपोषण इ संदर्भात केलेले कष्ट व प्रयत्न नेहमीच दुर्लक्षित राहिले. आाहे. विधवा, निराधार, निराश्रित महिलांना आजही सन्मानजनक वागणूक दिली जात नाही.

**२) महिलांना तिरस्काराची भावना**

जोपर्यतू एखादी स्त्री एखाद्या पुरुषासोबत लग्न करत नाही तोपर्यत तिला सुवासिनी, सोभाग्यवती समजले जात नाही धर्मशास्त्रानुसार एखादी शुद्ध आत्मा शुभ्र / पवित्र मानली ज्ञाते. आणि अशुध्द आत्मा अपवित्र /अशुभ मानली जाते. या शास्त्रानुसार गोऱ्या स्त्रिया चांगल्या असतात आणि काळया स्त्रीया चांगल्या नसतात अशी टिका केली जाते.

**३) भौतिकवादी टिका**

पुरुषांना (चैतन्य) आणि स्त्रियांना (प्रकृति / वस्तु) मानले जाते. समाजात पुरुषांची भूमिका प्रभावी अधोरेखित केली आहे. स्त्रीयांना मात्र सेविका / दासी या दूष्टीने भूमिका अधोरेखित केली आहे. स्त्रीया म्हणजे भोगवस्तू असून पुरुषाची/ नवरयाची सेवा करणे हे स्त्रीयांचे कर्तव्य मानाने जाते, ज्या स्त्रीया अपत्या पतीच्या आज्ञेचे उल्लघन करतान त्यांना व्यभिचारी मानून त्याग केला जातो.

**४) सामाजिक प्रवृत्ती**

स्त्रीया पुरुषांच्या तुलनेत शारिरीक व मानसिकदृष्ट्या दुबळया, कमकुवत असतात असे मानले जाते. बुध्दीमत्ता, व्यवहारचातुर्य, निर्णय क्षमना, कर्तृत्व, इ बाबतीत स्त्रिया मागे पडतात. भारतीय संविधानाने स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार दिला आहे, अनेक सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तरीसुद्धा आजपर्यंत स्त्रीयांना व पुरुषांना एकसमान अधिकार मिळालेला नाही.

**५) चुकीची गृहीतके :**

स्त्रीया जन्मत:च पुरुषांच्या तुलनेत हिन दिन असतात असा चुकीचा गैरसमज आहे. लहानपणापासून मुलीना कुटुंबाकडून पोषक आहार, सुरक्षा, शिक्षा, स्वातंत्र्य, आवडी, निवडी, पसंती इ बाबतीत् कुचंबना केली जाते. अभ्यासाअंती असे निदर्शनास आले आहे कि अनेक महिला कुटुंब चालवण्यासाठी नोकरी करतात परंतु मिळालेल्या उत्पन्नाचा मोणभाग घरखर्चासाठी करतात, पण व्यक्कीगत खर्चासाठी करत नाही.

**६) महिला साक्षरतेचा कमी दर**

भारतातील महिला साक्षरतेचा दर खूप कमी आहे. कमी साक्षरतेमुळे अनेक महिलांना अनेक क्षेत्रात अकुशल कामगार म्हणून काम करावे लागते. कुंटुबातील जबाबदारी बरोबरच नोकरी व्यवसाय सुध्दा करतात. परंतु दुहेरी भूमिका केल्याबद्दल प्रशंसा / कौतुकांची थाप त्यांच्या पाठीवर पडत नाही. कुटुबाला सुखी संपन्न करण्याच्या कार्याबद्दल त्यांना कोणताही मोबदला, संरक्षण, सुट्टीरजा, कोणताही लाभ मिळत नाही. स्त्रीयांचे काम विनामोबदला सेवा आहे

**७) स्त्रीभ्रुण हत्या**

ज्या देशात संविधानानुसार पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार दिले आहेत त्याच देशात, हजारो मुलीना जन्माला येण्यापूर्वीच हत्या केली जाते ही खुप लाजिरवाणी गोष्ट आहे. भारतात गेल्या १०, वर्षात विविध क्षेत्रात स्त्रीभ्रुहत्येचे प्रमाणात खुप वृद्धी झाली आहे.

१९ ते २० व्या शतकाच्या मध्यकाळात स्त्रीपुरुषलिंग गुणोत्तर प्रमाण- १००० पुरुषामागे ९७२ होते. १९९१ मध्ये पुरुषामागे ९२९, तर २००१ मध्ये या प्रमाणात वाढ झालेली असून १००० पुरुषामागे ९३१ स्त्रीया इतके प्रमाण झाले आहे. त्यासाठी गर्भलिंग निदान व तपासणी यावर कडक नियंत्रण कारवाई होणे गरजेचे आहे

**८) आर्थिक दृष्टीकोण**

समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकामध्ये किवा कमी उत्पन्न गटातील लोकांचा मुलींच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा आर्थिक बोझा / भार असाच आहे. मुलीना जन्म देणे, त्यांच्या पालनपोषण खर्च, लग्न खर्च, शिक्षण खर्च, हुंडा, गरोदर व बाळतंपणाचा खर्च हा पालक वर्गाला करावा लागतो. इ अनेक आर्थिक कारणामुळे सुद्धा मुलींना जन्माला येण्यापूर्वीच त्यांची हत्या केली जाते.

**९) इच्छेविरुध्द लग्न (Forced Marriage)**

१९७८ च्या बालविवाह प्रतिबंध कायद्यानुसार १८ वर्षाखालील मुलींचा विवाह करने कायदेशीर गुन्हा आहे. विशेषतः ग्रामीण भागात वयवर्ष ११ ते १६ या गटात मुलींचे सक्तीने विवाह केले जातात. परिणामी अपरिपक्वता मुलांना जन्म देणे, मातृत्व, मुलांचे पालनपोषण, घरसंसार घरंगुती तंटे इ. गुंतागुनीमध्ये मुली अडकून राहतात. अशा महिला संधी, स्वातंत्र्य, अधिकारापासुन वंचित राहतात.

**१०) कौटुंबिक / अत्याचार हिंसाचार (Domestic Violence)**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक संस्थांच्या व अभ्यासगटाच्या अहवालानुसार जवळपास ६०% महिला कौटुंबिक व वैवाहिक हिंसाचार/अत्याचाराला बळी पडलेल्या आहेत. (१७ December २००४ - Times of India) भारताच्या राष्ट्रीय अपराध संघाच्या सर्वेक्षणानुसार १९९४ मध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटनांची संख्या ८२८१८ होत्या, १९९८ मध्ये ही संख्या ११३००० पर्यंत वाढली. त्यापैकी १३९१० बलात्काराशी संबधिन घटना होत्या. स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, बलात्कार, जातीय अत्याचार, यास्वरूपात स्त्रीयांवरील हत्याचाराचे प्रमाण अधिक आहे

१९९९ भारत सरकारच्या एक अहवालानुसार सन १९९९ ते २००१ मध्ये ६३४७ महिलांना जाळून मारले गेले आहे.

**११) शिक्षण हक्कापासून वंचित**

पुरुषप्रधान संस्कृतिने मुलीचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला आहे विशेषतः ग्रामीण भागात शिक्षण सुविधांचा अभाव, वाढती गरीबी, आर्थिक बिकट परिस्थिती, मुळे आईवडील रोजगार करतात. त्यामुळे मुलींच्यावर घरगुती कामे मुलांचे पालनपोषण, इंधन गोळा करणे, जनावराचे पालन पोषण, शेतीकाम, स्वयंपाक, स्वच्छता सर्व जबाबदारी मुलींच्यावर सोपवली जाते. परिणामी अनेक मुलींना इच्छा पात्रता बुध्दीमत्ता असुनही शिक्षणा पासून वंचित राहावे लागते.

**१२) महिला निरक्षरता**

आज भारतातील एकूण महिलांच्या संख्येपैकी जवळपास ५०% महिला अशिक्षित आहे. सरकारकडून महिला शिक्षणावर होणारा खर्च खूप कमी आहे. सन २००१ मधील जन गणनेनुसार भारतातील महिला साक्षरतेचे प्रमाण ५४.१६% आहे. ग्रामीण महिला साक्षरतेचे" ४६.७० % आहे. २००१ २ कोटी ९६ लाख निरीक्षर आहेत. सन १९९१ पूर्वी हे प्रमाण ३२ कोटी ८ लाख इतके होते. सन २००४, नतर मात्र शिक्षणाच्या बाबतीत मुला मुलांच्या तुलनेत अग्रेसर राहिल्या आहेत

**१३) महिलांचे महिलांशी गैरव्यवहार**

कुटुंबातील जेष्ठ महिलाकडून कनिष्ठ लहान महिलाना अपमानास्पद वागणूक दिली जाते. उदा सासुकडून सुनेला दिली जाणारी वागणूक कुटुंबात येणाऱ्या नववधू जर सुंदर, बुद्धिमान, सुशिक्षित, कर्तबगार, पगारी असेल तर ईर्षा, हेवेदावे, मानहानी वादविवाद घरगुती तंटे निर्माण होतात. एकस्त्रीच दुसया स्त्रीची मैत्रीण होण्याऐवजी वैरीण होते. धार्मिक सणउत्सव,

सामा. कार्यात राजकीय क्षेत्रात अनेक महिला इतर महिलांना आदर सन्मानपूर्वक वागणूक दिली नाही. महिला महिलांमध्येच पुरुषांच्यापेक्षा जास्त स्पर्धा, चढाओढ, संघर्ष, मतभेद दिसुन येतात.

**१४) जातीय भेदभाव**

भारतीय समाजात आजही महिलांच्यात जातीय व धार्मिक भेदभाव झालेला दिसून येतो. दलित या शब्दाचा अर्थ दबलेला असा आहे, एकदलित महिला दोन प्रकारचे अन्याय सहन करते एककारण म्हणजे ती दलित आहे व दूसरे कारण म्हणजे ती महिला आहे. कधीकधी आपापल्या समाजातील तर कधी इतर समाजातील लोकांच्याकडून महिलांचे शोषण होते परिणामी महिलांमध्ये संघटन, सहकार्य, आत्मीयता इ भावना निर्माण होत नाहीत. या कारणामुळे कोणत्याही अन्यायाविरुद्ध प्रतिकार संघर्ष होवू शकत नाही.

**१५) वेश्या प्रवृत्तीला बळी**

लैंगिक शोषण ही आज भारतीय समाजातील एक भयानक वास्तव आहे. सेक्स टूरिज्म चा प्रसार भारतात मोठ्या प्रमाणात होत आहे. तरुणमुलींना, देहविक्री व वेश्याव्यवसायांसाठी भाग पाडणे, प्रवृत्त करणे, सक्ती करणे एवढेच नव्हेतर प्रसंगी तिची हत्या केली जाते याचे गंभीर परिणाम म्हणजे स्त्रिया एडस् सारख्या आजाराला बळी पडतात तसेच वैश्या म्हणून जीवन जगतात. अशा महिलांना कुटुंब, समाज स्वीकारत नाही, जीवंतपणी मरण प्राय यातना दुःखच त्याच्या नशिबी उरते.

**भारतातील महिलांचे कायदेशीर उपाययोजना**

**१) समान अधिकार**

भारतीय संविधानातील कलम १४ व १५ नुसार महिलांना पुरुषाबरोबर हक्क दिला आहे. तसेच स्त्री पुरुष याच्या लिंगभेद केला जाणार नाही असे स्पष्ट नमूद केले आहे.

**२) सार्वजनिक क्षेत्रात रोजगार**

कलम १५ नुसार लिंगभेदानुसार स्त्री / अथवा पुरुषाला सार्वजनिक ठिकाणी सेवा प्रदान लाभ घेण्यापासून वंचित करता येणार नाही. कलम १६ नुसार स्त्री / पुरुषाला सरकारी नोकरीत समान हक्क दिला जाईल, एकसमान कार्य केल्यास मिळणारे वेतनही समान राहिल.

**३) संसद मध्ये आरक्षण**

संविधानातील ७३ व ७४ व्या विधेयकानुसार महिलांना संसदेत व विधिमंडळ / सभामध्ये ३३ आरक्षण मिळण्यासाठी विधेयक मंजुर करण्यात आले. राजकीय पक्षात ३.३% महिलाच आहेत. त्यामुळे स्थानिक योजना, आर्थिक अनुदान, जबाबदारी व धोरण व योजना या संदर्भात निर्णय घेण्याची क्षमता महिलांना प्राप्त करून दिली आहे. तसेच सं १९८६ मध्ये घटस्पोट, पोटगी, उत्तराधिकारी इ घटनांच्या संदर्भातील खटले निवारण्यासाठी कुटुंब न्यायालयची स्थापना करण्यात आली.

**४) प्रदत्त अधिकार**

एक स्त्री मुलाला जन्म देते, मुलांचे पालन पोषण करते, त्यामुळे कायद्यानुसार त्या मुलांचा प्रदत्त अधिकार महिला प्राप्त करू शकते. कर्नाटक सरकारने एक नियम सहमत केला की शाळा महाविद्यालयात मुलांच्या प्रवेश अर्जावर / कागदपत्रावर सुध्दा आईच्या नावाचा उल्लेख / नोंद केली पाहिजे. त्यानंतर इतर राज्यांनी सूद्धा कर्नाटक प्रमाणे हा नियम आपापल्या राज्यात लागू केला आहे.

**५) लैंगिक शोषण विरुद्ध कायदा लैंगिक**

भारतात लैगिक शोषणाविरुद्ध कडक कायदे संमत केले आहेत, परंतु या कायद्याचा लाभ महिलांकडून घेतला जात नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे स्त्रीयांना सामाजिक प्रतिष्ठा, समाजातील बदनामी, आणि दुसरे म्हणजे या कायदयाचा आधार घेतल्यास कुणी त्याचा बदला / सूड घेतला जाईल,

**६) आर्थिक व राजकीय अधिकार**

स्वातंत्र्योत्तर काळात ६० वर्षांनी अनेक क्षेत्राचा विकास होऊन सुध्दा भारतातील जवळपास १२० कोटी लोकापैकी सर्वातजास्त दारिद्रयात जीवन काटणाऱ्या महिला व तरूणींचे प्रमाण जास्त आहे. शहरी भागात ७०% आणि ग्रामीण भागात ९०% अकुशल महिलां कामगार आहेत. ग्रामीण भागात 15-45 वयोगटातील मातामृत्युदर १२.५% आहे मुलांच्या तुलनेत प्रतिवर्षी ३-४ लाखमुलींचा मृत्यू होतो.

**७) कल्याणकारी योजना**

धोरणकर्ते / शासन महिला सक्षमीकरनासाठी विविध कल्याणकारी योजना राबवताना दिसुन येते. यामध्ये शिवणकाम, पाककला, खादयपदार्थ, कला कुसर इ स्वयंरोजगार व उद्योजकता विकास प्रशिक्षण व कार्यक्रमाची अमलबजावणी केली आहे. धोरणकर्ते महिलांना सुविधा देताना त्यांच्या मर्यादा, विचार समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करताना दिसत नाही.

**८) विकास कार्यक्रम**

बहुतांश महिला ग्रामीण भागात राहत असुन त्यांच्या समस्या शहरी महिलांपेक्षा वेगळया स्वरूपाच्या आहेत, पोषक आहार, शुध्द पाणी, स्वच्छता, आरोग्य आरोग्य सुविधा इ साठी ग्रामीण महिलांना संघर्ष करावा लागतो. त्यामुळे जोपर्यत विकास योजना ग्रामीण महिलांच्या पर्यंत पोहचत नाहीत. तोपर्यत महिलांच्या विकासाला हातभार लागणार नाही.

**९) महिलांचा सहभाग**

कल्याणकारी योजना व विकास कार्यक्रम प्रत्यक्ष सक्रिय सहभाग असने अत्यावश्यक आहे. लोकांच्या प्रत्यक्ष सहभागाशिवाय विकास प्रक्रिया ही निरर्थक आहे. भारतीय समाजात महिलांना कनिष्ठ समजले जाते. पुरुषांनी कुटुंबातील सदस्यांनी स्त्रीयांना प्रेरणा प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रकट होण्याची संधी स्वातंत्र्य दिले पाहिजे.

**१०) महिलांचे संघटन**

महिलांच्या गावस्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत संघटना कार्यरत असल्या पाहिजेत. महिला संघटनेच्या दबावामुळे भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने आपल्या वार्षिक आर्थिक सर्वेक्षणात “बृहद आर्थिक योजना” मध्ये लिंग आधारीत समानता या नावाचा एक घटक जोडले. उद्योग व्यापार क्षेत्रातील परुषांच्या बरोबर महिला संघटनाचा सुध्दा संपर्क ठेवला. मानवी आधिकाराच्या संदर्भात जागतिक परिषदेत सर्वप्रथम १९९३ मध्ये स्त्रियांचा हक्काचा हक्काचा विचार व चर्चा केली.

**महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेले विविध विभाग व समिती**

- १) महिला अत्याचार प्रतिबंध विभाग
- २) महिला पोलिस सहाय्यता कक्ष
- ३) महिला सुरक्षा समिती
- ४) सामाजिक सुरक्षा विभाग
- ५) विशेष समुपदेशन केंद्र
- ६) बसस्थानकातील मदन केंद्र
- ७) स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधक उपाययोजना (१९९४)
- ८) हेल्पलाईन विभाग (१९९१)
- ९) कामाच्या ठिकाणी तक्रार समिती
- १०) अनैतीक व्यापार विरोधी कक्ष
- ११) लैंगिक अपराध संरक्षण अधिनियम २०१३
- १२) हुंडाबळी प्रतिबंध कारवाई विभाग
- १३) न्यायाधीश धर्माधिकारी समिती

**सारांश / निष्कर्ष**

महाराष्ट्रात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, छत्रपती शिवाजी महाराज इ समाजसुधारक व राज्यकत्यांनी महिलांचे समाजातील स्थान दर्जा अधोरेखित केला. स्वातंत्र्यउत्तर काळात अनेक कर्तबदार स्त्रीयांनी डॉ. आनंदी जोशी, ताराबाई शिंदे, पंडीता रमाबाई इ अनेक स्त्रियांनी आपले हत्क, प्रश्न समस्या, परिस्थितीला विरोध प्रतिकार करण्याचा प्रतिकार केला.

पत्नी, सुनु, मुलगी, आई या पारंपारीक भुमिकाबरोबरच डॉक्टर, संशोधक, वैज्ञानिक, शिक्षक अधिकारी अशा भूमिका यशस्वीपणे पार पाडत आहेत. परंतु अजामिनीला अनेक महिलांना त्यांचे हक्क व अधिकारापासून डावलले जाते, वंचित ठेवले जाते. याची अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला पहावयास मिळतात, अजूनही तिच्या बुद्धीमतेला, कर्तुत्वाला क्षमताना संधी नाकारली जाते. महिलाशक्ती व कर्तुत्वाला वाव दिला, हक्क दिला तर देशाचा काया पालट व्हायला वेळ लागणार नाही. त्यासाठी विविध कायद्याची व हक्काची जाणीव माहिती तिला करून देणे गरजेचे आहे. महिलांना आपल्या हकांची व कायदयाची माहिती असेल तर तिच्यावर होणाऱ्या अन्यायावर ती प्रतिकार करेल, भयमुक्त वातावरणात जगेल. समाज, कुटुंब, व व देशांच्या प्रगतीला हातभार लागेल.’’करो नारीका सम्मान बनेगा देश महान."

**संदर्भसूची**

१) महिला सशक्तीकरण डॉ. उपमा सक्सेना, अध्यायान प्रकाशन, दिल्ली
२) भारतीय समाज मे महिला सशक्तीकरण, डॉ. दिनेश कुमार, जे.टी.एस.प्रकाशन दिल्ली
३)www.Jetter.org (ISSN-२३४९-५१६२) journal of enginnering Technology and Innovative Research (JETTR)
४) tttps:// wikipedia.org/s/c८b/wiki स्त्रीसक्षमिकरण
५) विधिलिखित कायदेविषयक जनजागृतीसाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची पुस्तक मालिका प्रकाशक – महाराष्ट्र राज्य महिला आयोग म्हाडा भवन, कलानगर,मुंबई.